**नि. फौ. ख. क्र. ८८६/२०२६**
**महाराष्ट्र शासन वि. अजिंक्य पवार व इतर १९**
**गु.र.नं.२५०/२०२६, फौजदार चावडी पोलीस**
**भा. न्यां. स. कलम३१८(४), ३३६(२),**
**३३६(३), ३३८, ३४०(२), ३(५) प्रमाणे.**

**<u>आरोपी क्र. ०१ याच्या निशाणी क्र. २१ जामीन अर्जावरील आदेश</u>**

आरोपी क्र. ०१ नामे अजिंक्य रमेश पवार यांनी त्यांच्या विद्वान विधीज्ञांमार्फत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८० प्रमाणे जामीन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज व त्यावर दाखल केलेले सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपासी अधिकारी यांचे म्हणणे पाहिले.

**०३.** आरोपी क्र. १ च्या वतीने विद्वान श्री. आर. एस. मात्रे आणि अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. टि. व्ही. लिमण यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** आरोपीच्यावतीने युक्तीवाद करण्यात आला की, प्रस्तुतचा गुन्हा सहा.कामगार आयुक्त सोलापूर यांच्या आदेशाप्रमाणे आरोपी क्र.१ ते २० यांच्याविरुध्द दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १ ते ३ हे दुकाने निरीक्षक तथा सुविधाकार श्रेणी–१ व २ या पदावर सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, दमाणी नगर, सोलापूर या ठिकाणी नोंदणी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. आरोपी क्र.४ ते १४ हे सदर कार्यालयात कंत्राटी कर्मचारी असून आरोपी क्र. १५ ते २० हे एजंट म्हणून काम करणारे इसम आहेत. प्रस्तुत गुन्ह्यामध्ये आरोपींनी बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांकरिता सरकारी योजनेप्रमाणे असलेल्या शैक्षणिक योजनेअंतर्गत असलेल्या शिष्यवृत्तीच्या पैशांचा बांधकाम कामगारांच्या पाल्यांचे शैक्षणिक बनावट बोनाफाईड व संगनमताने कागदपत्रे तयार करुन आणि सदरची कागदपत्रे खोटे व बनावट असतानाही बांधकाम कामगारांचा पाल्यांना शिष्यवृत्ती मंजूर केल्यामुळे शासकीय रक्कमेची फसवणुक केलेली आहे असा आरोपींवर आरोप ठेवण्यात आलेला आहे.

०५. आरोपीच्या वतीने पुढील युक्तीवाद असा की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्यामार्फत दि.०५/०२/२०२५ रोजी बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतनीकरण, लाभवाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर सर्वकष सुचना दिलेल्या आहेत. सदर कार्यसुची प्रणालीनुसार बांधकाम कामगारांच्या पाल्यांच्या नोंदणी व लाभाकरिता आलेल्या अर्जाच्या कागदपत्रांची पडताळणी तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये करण्यात येईल आणि कागदपत्रांची प्राथमिक छाननी करण्याची सर्वस्वी जबाबदारी लिपीकावर ठेवण्यात आलेली आहे. नोंदणी अधिकाऱ्याकडे केवळ लाभासाठी आलेला फॉर्म स्विकारणे किंवा नाकारणे एवढीच प्रक्रिया देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत गुन्ह्यात आरोपी क्र. १ हा नोंदणी अधिकारी असल्याने सदर आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही. लाभासाठी आलेल्या अर्जांची छाननी करणे, कागदपत्रांची पडताळणी करणे ही सर्वस्वी जबाबदारी ही इतर आरोपींची होती. आरोपी क्र.१ याने त्याच्या नोकरीच्या कालावधीमध्ये साधारण ६,९८० लाभार्थ्यांचे अर्ज नामंजूर केलेले आहेत. प्रस्तुत गुन्हयामध्ये आरोपी क्र. १ याचा सहभाग आहे असा सरकारपक्षाचा एकहीसाक्षीदार सांगत नाही. तसेच आरोपीच्या वैयक्तीक खात्यामध्ये प्रस्तुत गुन्हयातील फसवणुकीची रक्कम जमा झालेली आहे असा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. आरोपी क्र.१ हा सरकारी कर्मचारी असल्याने ते कोठेही परागंदा होणार नाही. प्रस्तुत गुन्ह्याचा सर्वोतोपरी तपास पुर्ण होऊन न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल झालेले आहे त्यामुळे आरोपीने तपासामध्ये हस्तक्षेप करण्याची किंवा साक्षीदारांवर दबाव आणण्याची कोणतीही शक्यता नाही. आरोपी क्र.१ हा दि.२४/०४/२०२६ पासून न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. प्रस्तुतचा गुन्हा हा पुर्णपणे कागदोपत्री पुराव्यांच्या आधारावर असून प्रस्तुत गुन्ह्याचा पुर्ण तपास झालेला असून न्यायालयात दोषारोपपत्र देखील दाखल झालेले आहे. आरोपी क्र. १ याचा प्रस्तुत गुन्ह्यात सहभाग नसल्याने त्यांचा जामीन अर्ज योग्य शर्ती व अटी घालून मंजूर करावा.

०६. आरोपीचे विधीज्ञ यांनी मा. सर्वाच्च न्यायालय यांच्या ***1)Sushila Agrawal & Ors. Vs. State NCT, Delhi AIR 2020 S.C. 831, 2)Sanjay Chandra Vs. C.B.I., AIR 2012 SC 830, 3) P. Chidambaram Vs. C.B.I., 2020 Cri.LJ. 663, 4) Totaram Vs. State of M.P. 2023 LiveLaw S.C.289, 5) Y.S.Jagan Mohan Reddy Vs. Central Bureau of Investigation 2013***

***GoJuris (S.C.) 378, 6) P. Krishna Mohan Reddy Vs. The State of Andhra Pradesh 2025 LiveLaw (SC) 598, 7) Mohammad Wani Vs. U.T. of J&K & Anr., 8) PapanSarkar@ Pranab Vs. State of West Bengal 2026 LiveLaw (SC)532, 9) Anwar Dhebar s/o. Late Hazi Zikar Dhebar Vs. State of Chhattisgarh MCRC No.8136/2025, (H.C. of Chhattisgarh at Bilaspur),10)Satender Kumar Antil Vs. Central Bureau of Investigation and Anr, AIR 2022 S.C.3386 AIROnline 2025 SC 956, 11)Abdul aliasBadrssul Vs. State of Sikkim 2020Cri.L.J.990, 12) Sikkim High Court AIROnline 2019 Sik 68, and 13) Dipakbhai Jagdishchandra Patel Vs. State of Gujarat and Anr. AIR 2019 S.C.3363*** या खटल्यांच्या न्यायनिर्णयांचा आधार घेत सांगितले की, केवळ प्रस्तुतचा गुन्हा आर्थिक स्वरुपाचा आहे म्हणून आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करता येणार नाही. आरोपींनी पोलीसांसमोर नोंदविलेल्या जबाबावरुन व न्यायालयापुढे दिलेल्या कबुली जबाबावरुन आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करता येणार नाही. मुळात आरोपीने दिलेला कबुली जबाब हा इतर सह–आरोपींविरुध्द याक्षणी जामीन अर्जाच्या वेळी विचारात घेतला जाणार नाही. सदर जबाबाचा वापर केवळ संपरिक्षेदरम्यान केला जावू शकतो. केवळ आरोपीविरुध्द गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल आहे व त्याच्याविरुध्द इतरही केसेस दाखल आहेत या बाबींमुळे आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर करता येणार नाही. गुन्हा जरी शासकीय रक्कमेच्या अपहारा संदर्भातील असेल, परंतु, प्रस्तुत आरोपीविरुध्द गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याबाबत तपासामध्ये निष्पन्न न झाल्यास आरोपीचा जामीन अर्ज मंजूर करण्यात यावा. आरोपी क्र.०१ हा सरकारी कर्मचारी असल्यामुळे आणि प्रस्तुत गुन्ह्यामध्ये कार्यालयीन तपासाअंती प्रस्तुतचा गुन्हा दाखल झालेला असल्याने आरोपीने साक्षीदारांवर दबाव आणण्याचा प्रश्न येत नाही.

**०७.** याउलट, अभियोग पक्षाच्यावतीने विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुत गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असून अजामीनपात्र आहे. प्रस्तुत गुन्ह्यामध्ये आरोपी क्र. १ ते ३ हे सहा. कामगार आयुक्त कार्यालयातील नोंदणी अधिकारी असून आरोपी क्र. ४ ते १४ हे कंत्राटी कर्मचारी असून आरोपी क्र. १५ ते २० हे एजंट आहेत. प्रस्तुत गुन्ह्यामध्ये एकुण २० आरोपी असून सर्व आरोपींनी संगनमताने

शासनाच्या बांधकाम कामगार सुविधा योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांकरिता शैक्षणिक योजनेअंतर्गत शासनमार्फत मिळणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या रकमेच्या अपहार करुन रक्कम स्विकारुन शासनाची फसवणुक केलेली आहे. सर्व आरोपींनी संयुक्तपणे प्रस्तुतचा गुन्हा केलेला आहे. आरोपींनी प्रस्तुत गुन्ह्यामध्ये तयार केलेली बनावट कागदपत्रे, शिक्के यांची विल्हेवाट लावलेली आहे. पोलीसांच्या तपासामध्ये असे निष्पन्न झालेले आहे की, आरोपी क्र.१ व ९ यांनी प्रस्तुत गुन्ह्यातील एजंट आरोपींशी संगनमत करुन इतर कंत्राटी कर्मचारी आरोपी क्र.४ ते १४ यांचे युजरआयडी व पासवर्ड कामावरुन काढण्याची धमकी दूवन त्याचा वापर करुन जिल्हा कामगार केंद्रात वेळोवेळी शिष्यवृत्ती लाभार्थींची क्लेम मंजूर केलेले आहे. आरोपींनी बनावट बोनाफाईड तयार करण्यासाठी वापरलेला लॅपटॉप जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींचा प्रस्तुत गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याबाबत पोलीसांना सबळ पुरावा मिळून आलेला आहे. प्रस्तुतचा गुन्हा हा शासकीय योजनेचा बनावट कागदपत्रे सादर करुन लाभ मिळविल्यासंदर्भात असल्यामुळे त्यामुळे शासनाची रक्कम रु.३,६३,२०,०००/– इतक्या फसवणुक झालेली आहे. आरोपी क्र. १ याच्याविरुध्द यापुर्वीही उस्मानाबाद पोलीस स्टेशन येथे गु. रं. क्र. २६६/२०२२, भा.दं. वि. कलम. ४२०, ४०९, ४६७ असा दाखल झालेला आहे. एकंदरीत प्रस्तुत गुन्ह्याचे गांभीर्य आरोपींचा प्रभावी सहभाग, शासनाची झालेली आर्थिक हानी लक्षात घेता आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर करावा.

०८. उभय पक्षाकडून करण्यात आलेला युक्तीवाद व अभिलेखावरील दाखल असलेल्या प्रतीप्रेषण अहवालाच्या कागदपत्रांची पाहणी केली असता प्रथमदर्शनी असे दिसते की, प्रस्तुतचा गुन्हा हा शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांच्या पाल्यांचे बनावट बोनाफाईड, इतर शैक्षणिक कागदपत्रे तयार करुन आरोपींनी सहा. कामगार आयुक्त कार्यालय यांना सादर करुन त्या बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ मिळवून शासकीय रक्कम ३,६३,२०,०००/– इतक्या रकमेचा अपहार करुन शासनाची फसवणुक केलेली आहे. प्रस्तुत गुन्ह्यामधील आरोपी क्र. १ ते ३ हे सहा. कामगार आयुक्त कार्यालयातील दुकाने निरीक्षक तथा सुविधाकार श्रेणी–२ व १ चे नोंदणी अधिकारी असल्याचे दिसून येते. आरोपी क्र. ४ ते १४ हे तालुकास्तरावर कामगार सुविधा केंद्रासाठी नेमलेले कंत्राटी कर्मचारी आहेत. आरोपी क्र. १५ ते २० हे एजंट असल्याचे दिसून येते. प्रस्तुत गुन्ह्यातील दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,

वर नमुद सर्व आरोपींनी जवळपास २४४ बांधकाम कामगारांचे ४४६ अर्ज अवैद्य असल्याचे निष्पन्न झाल्याने प्रस्तुतचा गुन्हा संबंधित विभागाच्या चौकशीअंती नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींनी प्रस्तुत गुन्ह्यामध्ये जवळपास २५० लोकांचे एअरटेल बँक खाते व सिमकार्ड काढलेले असून त्याचा वापर सदर योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी केलेला आहे. पोलीसांना तपासामध्ये आरोपींनी दिलेल्या निवदेनानुसार असे निष्पन्न झालेले दिसते की, आरोपी क्र. १९ याने आरोपी क्र. ०१ व आरोपी क्र. ०९ यांच्याशी संगनमत करुन ई–५ शिष्यवृत्ती क्लेमसाठी लाभार्थी यांचे एअरटेल बँक ए.टी.एम. कार्ड, बी.एस.एन.एल. व जिओ कंपनीचे सिमकार्ड तसेच ठेकेदारांचे बनावट शिक्के तयार करुन, लाभार्थी यांच्या खात्यातील रक्कमा काढल्याचे कबुल केलेले आहे. सदर आरोपींना गुन्हा दाखल होणार आहे असे समजल्यानंतर त्यांनी लाभार्थी यांचे ए.टी.एम.कार्ड, सिमकार्ड व शिक्के जाळल्याचे निवेदन दिल्याने त्याप्रमाणे पंचनामा केलेला आहे. आरोपींनी बनावट बोनाफाईड तयार करण्याकरिता वापरलेला लॅपटॉप देखील निवेदनाने काढून दिलेला आहे व तो जप्त करण्यात आलेला आहे. सर्व आरोपी शासकीय योजनांचे अर्ज मंजूरीचे काम स्वतःकडे नसून इतरांकडे होते अशी भुमिका घेवून त्यांना प्रस्तुत गुन्ह्यात सुडबुध्दीच्या व चुकीच्या पध्दतीने गोवण्यात आलेले आहे असे सांगत आहेत.

**०९.** प्रस्तुत खटल्याच्या प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसते की, सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याकरिता कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्याकरिता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी आर.सी.एस. इम्पोटेक प्रा.लि. मुंबई या कंपनीस टेंडर देवून सदर कंपनी प्रत्येक तालुक्यात कामगार सुविधा केंद्राची स्थापना करुन त्या ठिकाणी कंत्राटी कर्मचारी नेमलेले आहे. मंडळाच्या योजनेप्रमाणे महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगारांचे पहिल्या दोन पाल्यांकरिता शैक्षणिक योजनेअंतर्गत क्र. ई–०५ योजना सुरु केलेली आहे. त्याप्रमाणे तालुक्याच्या संबंधित कंत्राटी कर्मचारी योजनेचे फॉर्म भरण्यासाठी त्यांचे समक्ष नोंदणीकृत बांधकाम कामगार उपस्थित राहिल्यानंतर सदर कामगाराने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन कागदपत्रे योग्य की अयोग्य याबाबतचा ऑनलाईन पध्दतीने शेरा मारुन पुढील कार्यवाहीकरिता नोंदणी अधिकारी यांच्याकडे वर्ग करतात. नोंदणी अधिकारी यांच्याकडे सदर लाभ मंजूरीकामी प्रकरण आल्यानंतर त्यांनी प्राप्त कागदपत्रांची पडताळणी

करुन कंत्राटी कर्मचारी यांनी दिलेला शेरा योग्य की अयोग्य याची खात्री अरुन अंतिम निष्कर्ष काढून मंजूर करणे किंवा नाकारण्याची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे असे दिसते. अभिलेखावरील उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी जा.क्र./२५३/२०२३/स.प्र.ना.–२०२३/प्र.क्र.१/योजना–०२ नुसार दि.०५/०२/२०२५ रोजी एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणक प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतनीकरणे/लाभवाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर अधिकची सुलभता/सुसुत्रता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने सर्वकष सुचना जाहीर केलेल्या आहेत. सदर सुचनांनुसार तालुकास्तरावर तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रास ऑनलाईन पध्दतीने सादर होणाऱ्या नोंदणी/नुतनीकरणे/लाभवाटप यांचे अर्ज प्राथमिक छाननीकरिता प्रथम लिपीक लॉगीन आय.डी.मध्ये येतात. सदर वेळी संबंधी बांधकाम कामगार सर्व मुळ कागदपत्रांसह सुविधा केंद्रात प्रत्यक्ष उपस्थित राहावा आणि संबंधीत लिपीकाने कागदपत्रांची खातरजमा करुन मुळ कागदपत्र योग्य की अपुर्ण असा शेरा नमुद करणे अपेक्षित आहे. त्यानंतर सदर अर्ज नोंदणी अधिकारी यांनी पडताळणी करुन स्विकृत अथवा नाकारणे अपेक्षित आहे.

**१०.** वर नमुद कार्यपध्दती ही बांधकाम कामगारांच्या तपशिलामध्ये बदल करुन मंडळाच्या विविध योजनांचा चुकीच्या पध्दतीने लाभ घेण्यास आळा घालणे आवश्यक असल्याने सदर कार्यपध्दती अंमलात आणलेली आहे. सदर योजनेचे अर्ज बनावट, चुकीचे आढळून आल्यास जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील तपशिल बदल लॉगीन आय.डी. हाताळणारे डाटा एंट्री ऑपरेटर, संबंधीत बदलास मान्यता देणारे तालुका नोंदणी अधिकारी व संबंधीत बांधकाम कामगार जबाबदार राहतील असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. सदर योजनेअंतर्गत अर्ज मंजूर होताना नोंदणी अधिकारी यांची महत्वाची जबाबदारी असल्याचे दिसून येते.

**११.** प्रस्तुत गुन्ह्यातील आरोपी क्र. ४ ते ८, १० ते १४ यांनी त्यांचा कबुली जबाब न्यायालयापुढे नोंदविलेला आहे. वर नमुद सर्व आरोपींच्या भा. ना. सु. सं. कलम १८३ प्रमाणेच्या जबाबावरुन असे दिसते की, सदर आरोपी कंत्राटी पध्दतीने डेटा एंन्ट्री ऑपरेटर म्हणून कामगार सुविधा केंद्रावर कार्यरत होते. सदर आरोपींना शासकीय योजनेचे फॉर्म भरुन घेण्यासाठी दिलेल्या लॉगीन आय.डी. व पासवर्डचा वापर करुन आरोपी क्र. ९

याने चुकीच्या पध्दतीने पात्र नसलेल्या अर्जदारांचे लाभार्थी म्हणून अर्ज भरलेले होते. सदर आरोपींचा लॉगीन आय.डी. व पासवर्ड आरोपी क्र. ९ यास न दिल्यास सदर आरोपी क्र. ९ हा वर नमुद आरोपींना आरोपी क्र. १ करवी नोकरीवरुन काढण्याची धमकी देत होता. आरोपी क्र. ४ ते ८ व १० ते १४ यांच्या लॉगीन आय.डी. चा वापर करुन खोटे बनावट फॉर्म मंजूर करुन घेतल्यामुळे आणि कागदपत्र सादर न केल्यामुळे कंपनीने वर नमुद आरोपींना कामावरुन काढून टाकलेले आहे.

**१२.** महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगारांच्या कल्याणाकरिता जाहीर केलेल्या शिष्यवृत्ती योजनांचा योग्य पध्दतीने पात्र उमेदवारांना लाभ मिळणे आवश्यक असल्याने सदर योजना अंमलात आणलेली असल्याचे दिसते. त्यामुळे पात्र व गरजु उमेदवारांना सदर योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत गुन्ह्यामध्ये आरोपी क्र. १ ते ३ नोंदणी अधिकारी, आरोपी क्र. ४ ते १४ कंत्राटी कर्मचारी आणि आरोपी क्र. १५ ते २० एजंट यांनी संगनमताने सदर योजनेचे बनावट कागदपत्रांच्या आधारे अर्ज सादर करुन, दाखल करुन, मंजूर देवून चुकीच्या पध्दतीने बनावट लाभार्थींच्या खात्यामध्ये शासनाची एकुण रक्कम ३,६३,२०,०००/– रक्कम वर्ग केलेली आहे. प्रस्तुत गुन्ह्यामध्ये दोषारोपपत्र दाखल झालेले असले तरी आरोपींवर ठेवण्यात आलेला अपराध हा गंभीर स्वरुपाचा असून शासनाच्या रक्कमेची फसवणुक केल्यासंदर्भातील आहे.

**१३.** आरोपी क्र.१ विरुध्द यापुर्वीही गु.र.क्र.२६६/२०२२, भा.दं.वि.कलम ४२०, ४०९, ४६७ उस्मानाबाद पोलीस स्टेशन येथे दाखल असल्याचे दिसून येतो. प्रस्तुत गुन्ह्यामध्ये शासकीय योजनांच्या माध्यमातून अपात्र उमेदवारांच्या नावाने अर्ज भरुन लाभार्थी म्हणून रक्कम स्विकारण्यामध्ये एजंट, कंत्राटी कर्मचारी व नोंदणी अधिकारी यांचा सहभाग असल्याशिवाय अशा गैरपध्दीतीने योजनांचा लाभ मिळविता येणार नाही असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वर नमुद केल्याप्रमाणे प्रस्तुत गुन्ह्यात शासनाच्या/ जनतेच्या पैश्यांचा मोठ्या प्रमाणावर अपहार झालेला आहे असे दिसून येते. प्रस्तुतचा गुन्हा जरी पुर्ण कागदपत्रांवर आधारीत असला तरी आणि गुन्ह्याचा तपास पुर्ण होवून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले असले तरी प्रस्तुत गुन्ह्यामधील आरोपींचा सहभाग किती प्रमाणात आहे किंवा नाही याबाबत संपरिक्षेदरम्यान पुराव्यानिशी समजून येणार आहे. आरोपी क्र. १ हा सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय येथे नोंदणी अधिकारी

असल्याने शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आलेल्या अर्जांची शाहनिशा करणे व त्यानुसार सदर अर्ज मंजूर किंवा नामंजूर करणे हे महत्वाचे कर्तव्य आहे. दिनांक २७/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र शासन कामगार आयुक्तालय यांच्यामार्फत आदेश जारी करुन आरोपी क्र. ०१ विरुध्द निलंबनाची कार्यवाही केल्याचे दिसून येते. सदर आरोपी क्र. १ याच्याकडे योजनेचे अर्ज अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन सादर करणे ही महत्वाची जबाबदारी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचारी, डाटा ऑपरेटर व एजंट यांची देखील आहे. अशा गुन्ह्यांमध्ये निष्काळजीपणाने देखील झालेली चुक ही गंभीर बाब आहे. शासनाच्या योजनेचा लाभ गैरपध्दतीने बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळविणे म्हणजे एक प्रकारे सामान्य जनतेच्या पैश्यांचा अपव्यय आहे. एकंदरीत वर नमुद सर्व चर्चिलेप्रमाणे आरोपी क्र. १ याचा जामीन अर्ज मंजूर करावा असे न्यायालयास न्यायोचित वाटत नाही. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

आरोपी क्र. ०१ याचा प्रस्तुत जामीन अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SANDIP BABASAHEB NAVALE
Digitally signed by SANDIP BABASAHEB NAVALE
Date: 2026.07.31 18:06:39 +0530

दिनांकः– ३१/०७/२०२६.

(एस. बी. नवले)
०९ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
सोलापूर.